प्रेस प्रकाशन PRESS RELEASE

भारतीय रिझर्व्ह बँक
RESERVE BANK OF INDIA

**संचार विभाग**, केंद्रीय कार्यालय, एस.बी.एस.मार्ग, मुंबई-400001

**Department of Communication**, Central Office, S.B.S.Marg, Mumbai-400001

फोन/Phone: 022-22660502

वेबसाइट : www.rbi.org.in

Website : www.rbi.org.in

ई-मेल email: helpdoc@rbi.org.in

जुलै 11, 2019

**बँकिंग विनियामक अधिनियम 1949 च्या कलम 35 अ खालील निर्देश - युनायटेड को-ऑपरेटिव बँक लि. बागनान, पश्चिम बंगाल**

बँकिंग विनियामक अधिनियम 1949 च्या कलम 56 सह वाचित, कलम 35 अ च्या पोटकलम 1) खाली तिला देण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन, भारतीय रिझर्व्ह बँकेने, युनायटेड को-ऑपरेटिव बँक लि. बागनान, स्टेशन रोड उत्तर) , पो.ऑ - बागनान, जिल्हा - हावडा, पिन - 711303 पश्चिम बंगाल ह्यांना, जुलै 18, 2018 रोजीचे व्यवहार समाप्त झाल्यापासून, वेळोवेळी सुधारित केल्यानुसार निर्देश दिले होते. भारतीय रिझर्व्ह बँकेने, जनतेच्या हितासाठी आता ह्या निर्देशांना तीन महिन्यांची, म्हणजे जुलै 19, 2019 ते ऑक्टोबर 18, 2019 पर्यंत मुदतवाढ दिली आहे. ह्या निर्देशाची एक प्रत, जनतेच्या माहितीसाठी वरील बँकेच्या कार्यालयात लावण्यात आली आहे.

भारतीय रिझर्व्ह बँकेने हे निर्देश दिले ह्याचा अर्थ, भारतीय रिझर्व्ह बँकेने वरील बँकेचा बँकिंग परवाना रद्द केला आहे असा घेण्यात येऊ नये. वरील बँकेची आर्थिक स्थिती सुधारेपर्यंत ती बँक बँकिंग व्यवसाय निर्बंधांसह करणे सुरु ठेवू शकते. परिस्थितीवर अवलंबून ह्या निर्देशात बदल करण्याचा विचार भारतीय रिझर्व्ह बँक करु शकते. जुलै 9, 2019 रोजीचे व्यवहार समाप्त झाल्यापासून सहा महिन्यांच्या कालावधीसाठी निर्देश जारी असतील व वेळोवेळी त्यांचे पुनरावलोकन केले जाईल.

**योगेश दयाल**

मुख्य महाव्यवस्थापक

**प्रेस प्रकाशन : 2019-2020/119**